# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 18 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १८ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विधानावरून संसदेत गदारोळ–काँग्रेसवर दिशाभूल करत असल्याचा आरोप करत, शहा यांचं पूर्ण विधान ऐकण्याचं आवाहन
- विधान परिषदेच्या सभापती पदी राम शिंदे यांची बिनविरोध निवड निश्चित
- साहित्य अकादमीच्या वार्षिक पुरस्कारांची घोषणा - ज्येष्ठ समीक्षक सुधीर रसाळ यांना ‘विंदांचे गद्यरूप’ या समीक्षेसाठी पुरस्कार जाहीर

आणि

- रविचंद्रन अश्विनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती–बॉर्डर–गावस्कर मालिकेतील तिसरी कसोटी अनिर्णित

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केल्याचा आरोप करत, विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज बाधित झालं. लोकसभेत कामकाज सुरु होताच काँग्रेस, द्रमुक आणि डाव्या पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केली. संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल आणि सत्ताधारी सदस्यांनी त्यावर हरकत घेत, वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला, मात्र दोन्ही बाजूंनी घोषणा सुरु राहिल्याने अध्यक्ष ओम बिरला यांनी प्रथम दोन वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब केलं.

राज्यसभेतही काँग्रेस, द्रमुक, राजद, आमआदमी पार्टी आणि इतर विरोधी सदस्यांनी घोषणाबाजी केली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी विरोधकांचे आरोप खोडून काढले, मात्र गदारोळ चालूच राहिल्याने सभापती जगदीप धनखड यांनी दुपारी २ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब केलं.

दरम्यान, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी पत्रकार परिषदेत बोलतांना, अमित शहा यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची मागणी केली.

अमित शहा यांनी पत्रकार परिषद घेत, काँग्रेस पक्ष आपल्या विधानाची काटछाट करून जनमानसांत संभ्रम पसरवत असल्याचं, सांगत आपलं पूर्ण विधान जनतेसमोर ठेवण्याचं आवाहन शहा यांनी प्रसारमाध्यमांना केलं. ते म्हणाले –

> ***काँग्रेस पार्टीने फिर एक बार अपनी पुरानी पद्धती को आजमाते हुए बातो को तोड मरोडकर और सत्य को असत्य के कपडे पहनाकर समाज मे भ्रांती फैलाने का एक कुत्सित प्रयास किया। राज्यसभा मे मेरे बयान को तोड मरोडकर पेश किया गया। मै स्पष्टता के साथ कहना चाहता हूं, मेडिया को विनंती भी करना चाहता हूं कि मेरा पुरा बयान जनता के सामने रखिये।***

शहा यांचं संपूर्ण विधान केंद्रीय मंत्रिमंडळातल्या सदस्यांनी समाज माध्यमांवर सामायिक केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही काँग्रेसच्या या कृतीचा निषेध केला आहे. काँग्रेसने आतापर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अनेकदा अपमान केला असून आपली कृत्यं काँग्रेसला आता लपवता येणार नाहीत, असं मोदी यांनी म्हटलं आहे.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दलच्या वक्तव्यावर भाजपने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे, ते आज मुंबई इथं पत्रकार परिषदेत बोलत होते.

****

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले यांनीही शहा यांचं विधान अत्यंत आक्षेपार्ह आहे, असं म्हटलं आहे. ते नागपूर इथं विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलत होते.

****

राज्य विधान परिषदेच्या सभापती पदासाठी महायुतीच्या वतीनं राम शिंदे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महाविकास आघाडीनं कोणत्याही उमेदवाराच्या नावाची घोषणा केली नाही. तसंच दुपारी १२ वाजेपर्यंतच्या मुदतीत अन्य उमेदवाराचा अर्ज दाखल झाला नसल्यानं राम शिंदे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अधिकारी सेवा मुख्य परीक्षेचा निकाल मागील ११ महिन्यांपासून प्रलंबित असून संबंधित निकाल त्वरीत जाहीर करावा, अशी मागणी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी आज विधानपरिषदेत केली. आयोगाच्यावतीने महाराष्ट्र स्थापत्य अधिकारी सेवेच्या ४९५ पदांसाठी २८ जानेवारी २०२४ रोजी मुख्य परीक्षा घेण्यात आली. राज्यातील जवळपास पाच हजार विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. परीक्षा होऊन आता वर्ष संपत आलं तरी अद्यापही मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला नसल्याचं चव्हाण यांनी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

****

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज नागपूर इथं अनावरण करण्यात आलं.

www.home.maharashtra.gov.in या नावाचं अद्ययावत असं संकेतस्थळ आता माहितीजालावर उपलब्ध झालं आहे. मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी झालेल्या गृह विभागाच्या बैठकीत संकेतस्थळाचं अनावरण झालं.

****

जगभरातल्या संगीत रसिकांसाठी पर्वणी असलेला पुण्यातला मानाचा ७० वा सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव आजपासून सुरू होत आहे. येत्या २२ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या संगीत सोहळ्यामध्ये शास्त्रीय संगीतातल्या अनेक दिग्गज कलाकारांसह १५ नवीन कलाकार प्रथमच या मंचावर आपली कला सादर करणार आहेत.

****

आमिर खान निर्मित आणि किरण राव दिग्दर्शित लापता लेडीज हा चित्रपट ऑस्कर पुरस्काराच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. अंतिम १५ चित्रपटांच्या यादीत या चित्रपटाचा समावेश होऊ शकला नाही. हिंदी भाषेत चित्रीत केलेल्या ब्रिटीश–भारतीय संतोष या चित्रपटानं १५ चित्रपटांच्या यादीत स्थान मिळवलं आहे. पण, हा चित्रपट ब्रिटनकडून सादर होत आहे. ऑस्कर पुरस्कार सोहळा २ मार्च २०२५ ला होणार आहे.

****

साहित्य अकादमीचे वार्षिक पुरस्कार आज जाहीर झाले. आठ कवितासंग्रह तीन कादंबऱ्या दोन कथासंग्रह, तीन निबंध, तीन समीक्षाग्रंथ, एक नाटक आणि एक संशोधन ग्रंथ अशा २१ साहित्यकृतींना हे पुरस्कार घोषित करण्यात आले. ताम्रपट, शाल आणि एक लाख रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप असून ८ मार्च २०२५ रोजी दिल्ली इथं एका कार्यक्रमात हे पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केले जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर इथले ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना ‘विंदांचे गद्यरूप’ या समीक्षेसाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराबद्दल रसाळ यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या –

> ***हा मराठीला मिळणारा सर्वोच्च पुरस्कार मी मानतो. साहित्य अकादमीचा पुरस्कार हा सर्वोच्च पुरस्कार मी मानतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बा. सी. मर्ढेकर, प्रभाकर शास्त्री अशा महान विचारवंत टीकाकारांना जो परस्कार मिळाला तो मलाही मिळाला याचा मला विशेष आनंद होतो.***

****

क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विननं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. आज ब्रिस्बेन इथं झालेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यानंतर अश्विननं पत्रकार परिषदेत या निर्णयाची माहिती दिली. या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात अश्विननं ५३ धावांत १ बळी घेतला होता. अश्विनच्या क्रिकेट कारकिर्दीचा आढावा घेणारा हा संक्षिप्त वृत्तांत –

> ***६ नोव्हेंबर २०११ रोजी दिल्लीत वेस्ट इंडिजविरोधात आपला पहिला क्रिकेट कसोटी सामना खेळलेल्या अश्विननं एकूण १०६ कसोटी सामन्यांत ५३७ बळी घेतले. कसोटी क्रिकेटमध्ये अनिल कुंबळे***

***पाठोपाठ सर्वाधिक बळी घेणारा तो दुसरा भारतीय गोलंदाज ठरला. कसोटी क्रिकेटमध्ये ६ शतकं आणि १४ अर्धशतकंही त्याच्या नावावर आहेत. याशिवाय, एकदिवसीय क्रिकेट सामन्यांमध्ये १५६ बळी तर टी ट्वेंटी सामन्यांमध्ये त्याने ७२ बळी घेतलेत. ३०० कसोटी बळी आणि तीन हजार धावा अशी अष्टपैलू कामगिरी करणारा अश्विन क्रिकेट जगतातला ११वा खेळाडू ठरला, तर ११ वेळा मालिकावीर किताब पटकावत अश्विननं मुथय्या मुरलीधरनच्या विक्रमाशी बरोबरी साधली होती. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेत असलो तरीही, व्यावसायिक टी ट्वेंटी क्रिकेट खेळत राहणार असल्याचं अश्विननं जाहीर केलं आहे.***

दरम्यान, बॉर्डर-गावस्कर मालिकेतला तिसरा कसोटी सामना अनिर्णित राहिला. पाच सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघ एक - एकनं बरोबरीत असून, मालिकेतला चौथा सामना मेलबर्न इथं २६ तारखेपासून खेळवण्यात येणार आहे.

****

ओबीसींच्या हक्कासाठी आपला लढा सुरूच राहणार आहे, गरज पडल्यास रस्त्यावर उतरू असा निर्धार राज्याचे माजी अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री, ओबीसींचे नेते छगन भुजबळ यांनी आज नाशिक इथं व्यक्त केला. आज भुजबळ आणि त्यांच्या समर्थकांची नाशिक इथं बैठक झाली, यावेळी भुजबळ बोलत होते. राज्यभरात फिरून कार्यकर्त्यांशी चर्चा करण्यात येईल, त्यानंतरच आपली भूमिका स्पष्ट करण्यात येईल असं सांगितलं.

****

परभणी इथं हिंसाचारादरम्यान झालेल्या नुकसानापोटी कोणत्याही प्रथम माहिती अहवालाशिवाय पंचनामे करुन व्यापाऱ्यांना भरपाई देण्यात यावी, या प्रकरणात नागरिकांच्या तक्रारी असलेल्या तीन पोलीस अधिकाऱ्यांना तत्काळ सक्तीच्या रजेवर पाठवण्याचे आदेश राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य विधीज्ञ धर्मपाल मेश्राम यांनी दिले आहेत. त्यांनी आज परभणी इथं पत्रकार परिषद घेत याबाबत माहीती दिली.

****

छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेच्या वतीने राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन मोहीमेंतर्गत १६ डिसेंबर पासून २० डिसेंबर पर्यंत कुष्ठरोग तपासणी मोहीम सुरु झाली आहे.

****